**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**<u>उत्कृष्ट कलावंत, प्राविण्य प्राप्त स्पर्धक, साथीदार व चमू व्यवस्थापकांचा</u>**
**<u>२९ ऑगस्ट रोजी विद्यापीठातर्फे सत्कार</u>**

अमरावती-

राष्ट्रीय कव्वाली, मध्य विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत प्राविण्य प्राप्त चमूतील स्पर्धक, कलावंत, साथीदार व चमू व्यवस्थापक यांचा आणि विद्यापीठाद्वारे निवड करण्यात आलेल्या उत्कृष्ट कलावंत मुले व मुली यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळाद्वारे दि. २९ ऑगस्ट, २०१८ रोजी दु. ३.०० वाजता विद्यापीठ परिसरातील दृकश्राव्य सभागृहात करण्यात आले आहे.

मध्य विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर विद्यापीठाच्या स्पर्धकांनी नेत्रदीपक कामगिरी करुन विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घातली आहे. या स्पर्धांमध्ये त्यांनी पदके प्राप्त केली असून ही विद्यापीठासाठी गौरवाची बाब आहे. सत्कार करावयाच्या सर्व स्पर्धक, कलावंत मुले/मुली, साथीदार व चमू व्यवस्थापकांची यादी संबंधित महाविद्यालयांना पाठविण्यात आली आहे.

तरी सर्व संबंधितांनी उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. रविंद्र सरोदे यांनी कळविले असून काही अडचण असल्यास त्यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र. ९५०३४५७५४६ वर संपर्क साधता येईल.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २०/०८/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी